महाराष्ट्र टाइम्स

Date - 12 March, 2010

Publication - Maharashtra Times

Page No. - 16




# थिएटरमध्ये चीअरगर्ल्स!

आयपीएलचा 'बिग हंगामा' भारतात पुन्हा परतलाय. त्यामुळे सगळीकडेच नुसता उल्हास, जल्लोष ओसंडून वाहतोय. आयपीएलची मजा डबल करण्यासाठी आता थिएटरमध्येही 'लाइव्ह मॅच'ची मजा अनुभवायला मिळणार आहे... सो आर यू रेडी फॉर धिस फन?

**फील लाइक स्टेडिअम :** आयपीएलच्या मॅचेस पाहताना स्टेडियममध्येच मॅच पाहण्याचा 'फील' येतो. त्यामुळे घराच्या चार भिंतीत खोक्याएवढ्या टीव्हीवर मॅच पाहण्यापेक्षा फ्रेन्ड्स आणि फॅमिलीसोबत ही 'लाइव्ह मॅच' थिएटरच्या बिग स्क्रिनवर पाहता येईल. मॅच बघताना बिनधास्त जोरात जल्लोषही करता येईल.

**चिअरगर्ल्स आणि लाइव्ह बँड:** मॅचदरम्यान स्टेडिअमवर नाचणाऱ्या चिअरगर्ल्स काही थिएटरमध्ये प्रत्यक्षात अवतरणार आहेत. म्हणजेच प्रत्येक सिक्स, फोरनंतर उमटणाऱ्या चित्काराला साथ असेल ती चिअरगर्ल्सच्या थिरकणाऱ्या पावलांची!

**विदाऊट अॅड डबल मजा:** टीव्हीवर मॅच पाहताना येणारा मुख्य अडथळा म्हणजे डोकं फिरवणाऱ्या जाहिराती. या जाहिरातींमुळे मॅचच्या आनंदात मिठाचा खडा पडल्यासारखं होतं. थिएटरमध्ये मात्र जाहिरातींवर १०० टक्के बॅन आहे. त्यामुळे क्रिकेट फॅन्सना 'विदाऊट अॅड लाइव्ह मॅच'चा अनुभव घेता येईल.

- देशभरातील तब्बल १००० थिएटरमध्ये आयपीएल मॅचेस दाखविल्या जाणार आहेत.
- विशेष म्हणजे मॅचच्या तिकिटासाठी कोणतेही एक्स्ट्रा रेट असणार नाहीत. सिंगल स्क्रीन आणि मल्टीप्लेक्सच्या दरातच मॅचेसची मजा लुटता येईल.

■




## प्रथमच लाइव्ह

विशेष म्हणजे थिएटरमध्ये लाइव्ह मॅच अनुभवता येण्याचा प्रयोग आयपीएलच्या निमित्ताने प्रथमच होत आहे. जगभरात पहिल्यांदाच अशा प्रकारे लाइव्ह मॅच दाखवली जाणार आहे. व्हॅल्युएबल ग्रुपच्या युएफओ मूव्हीजतर्फे थिएटरमध्ये 'लाइव्ह मॅच' दाखविण्यात येईल. 'या प्रयोगात आम्ही नक्की यशस्वी होऊ असा विश्वास आम्हाला आहे. अशा प्रकारच्या उपक्रमांतून आधुनिक टेक्नॉलॉजीमध्ये भारत कुठेही कमी नाही हे पूर्ण जगाला आपण दाखवू शकू, असं मत व्हॅल्युएबल ग्रुपचे प्रमुख संजय गायकवाड यांनी व्यक्त केलं. 'अशा प्रकारच्या अनोख्या उपक्रमांमुळे गावागावात क्रिकेटचा प्रसार होईल. तसंच गावागावांत दडलेलं क्रिकेटमधलं टॅलेण्ट शोधून काढण्यास मदत होईल, असं मत मास्टरब्लास्टर सचिन तेंडुलकर यांनीही व्यक्त